# प्राथमिक शाळेतील शिक्षकांना आकारिक व संकलित मूल्यमापनाबाबत जाणवणा-या समस्यांचा अभ्यास

प्रा. डॉ. गोकुल. एस. डामरे
स्व.उत्तमराव देशमुख महाविद्यालय,शेगांव
E mail id - gsdamre@gmail.com

**सारांश**

*प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणामधून विद्यार्थ्यांच्या सगळ्या स्तरांवरील क्षमता आणि कौशल्य यांचा विकास अपेक्षित असतो आणि म्हणूनच विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन प्रक्रियेला सुध्दा विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मूल्यमापन हे अध्ययन-अध्यापन प्रकियेचा एक अविभाज्य अंग असल्याने आनंददायी अध्ययनाबरोबरच मूल्यमापन देखील असावे म्हणून शैक्षणिक नवीन धोरणानुसार, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या नवीन मूल्यमापन पध्दतीचा अवलंब प्राथमिक शिक्षणात सुरु करण्यात आला. या मूल्यमापनात आकारिक व संकलित अशा दोन भागात विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाते. यात त्यांच्या नोंदी ठेवणे, निष्कर्ष काढणे, श्रेणी ठरविणे, प्रश्नपेढी तयार करणे यातून. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होते या गोष्टी करतांना शिक्षकांना अनेक अडचणी निर्माण होतात.*

**संशोधनाची गरज –**

शिक्षक आणि विद्यार्थी हा शैक्षणिक प्रणालितील महत्वाचा घटक असतो. म्हणूनच प्रणाली अंतर्गत विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे व्यवस्थित व दर्जात्मक होण्यासाठी शिक्षकांना येणा-या समस्यांचे निवारण करणे आवश्यक आहे. त्यासाठी समस्यांच्या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यामुळेच मूल्यमापन पध्दतीमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. म्हणून ही पध्दती राबवितांना येणा-या समस्यांचा शोध घेणे गरजेचे ठरते.

**संशोधनाचे महत्व –**

कोणतीही पध्दती रबविण्यात येतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते त्या समस्यांचे निराकरण करुन प्रभावी उपाययोजना करावी लागते. यामुळे मूल्यमापन हे सुधारण्यास मदत मिळेल तसेच यातून विद्यार्थ्यांचा कल कोणत्या विषयाकडे आहे हे समजण्यास यामुळे मदत होईल.

**संशोधनाचे शीर्षक –**

“प्राथमिक शाळेतील शिक्षकांना आकारिक व संकलित मूल्यमापनाबाबत जाणवणा-या समस्यांचा अभ्यास.”

**संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये –**

1.आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दतीचा आढावा घेणे.
2.आकारिक व संकलित मूल्यमापनाविषयी प्राथमिक शिक्षकांचा दृष्टिकोन जाणून घेणे.
3.आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती राबवितांना प्राथमिक शिक्षकांना येणा-या अडचणींचा शोध घेणे.
4.आकारिक व संकलित मूल्यमापनाबाबत प्राथमिक शिक्षकांना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**परिकल्पना –**

परिकल्पना म्हणजे संशोधकाचा अनुभव, अभ्यास, वर्तन या तिन्हींवर आधारित असे समस्येचे संभाव्य उत्तर होय.

1.आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दतीत शिक्षकांना अडचणी जाणवतात.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –**

1.प्रस्तुत संशोधन हे बुलडाणा तालुक्यापुरतेच मर्यादीत आहे.
2.प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक शिक्षकांपूरतेच मर्यादीत आहे.

3.प्रस्तुत संशोधन हे आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती पुरतेच मर्यादीत आहे.

**संशोधन पध्दती –**

संबधीत संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधीत असल्याकारणाने सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आली.

**नमुना निवड -**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सुगम यादृच्छिक पध्दतीचा वापर करुन प्राथमिक शाळेतील 50 शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

**संशोधनाची साधने –**

प्रस्तुत संशोधनसाठी संशोधकाने शिक्षकांसाठी प्रश्नावली या साधनांचा वापर केलेला आहे.

**निष्कर्ष –**

1.आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती ही सर्वच प्राथमिक शाळेत राबविण्यात येते. या मूल्यमापन पध्दती विषयी प्राथमिक शिक्षकांना माहिती आहे. प्राथमिक शाळेत आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती लागू करणे शिक्षकांना योग्य वाटते.

2.आकारिक व संकलित मूल्यमापनातून विद्यार्थ्यांचा सातत्याने विकास होईल आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दती राबवितांना शिक्षकांना अडचणी जाणवतात.

3.ही पध्दती राबवितांना प्रत्येक वेळी नियोजन केले जाते.अध्यापन व मूल्यमापन पध्दती यांचे सोबतच नियोजन केले जाते.सर्व विषयांचे मूल्यमापन करुन तक्ते बनविण्यास शिक्षकांना कठीण वाटतात .

4.आकारिक व संकलित मूल्यमापन आणि पारंपारिक मूल्यमापन यात भिन्नता आहे. पारंपारिक मूल्यमापन पध्दतीतून केवळ विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेचाच विचार केल्या जातो. तर आकारिक व संकलित मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाकडे अधिक लक्ष दिले जाते. असा निष्कर्ष मुख्याध्यापकांच्या मुलाखत सूचीवरुन दिसून येतो.

5.आकारिक व संकलित मूल्यमापनाबाबत शिक्षकांना अनेक समस्या जाणवत असतात. त्या समस्यांवर उपाय म्हणून प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते. सर्व शिक्षा अभियानामार्फत घेण्यात येणा-या सर्वच प्रशिक्षण वर्गांना शिक्षकांना पाठविले जाते.

6. मूल्यमापन पध्दतीत सतत बदल होत आहे. त्यामुळे त्यात अडचणी निर्माण होतात त्या सोडविण्यासाठी शिक्षकाविषयी सभा, चर्चासत्र आयोजित करण्यात येतात. विद्यार्थी अनुपस्थिती याविषयी त्यांच्यात जागरुकता वाढविण्यसाठी विद्यार्थ्यांशी चर्चा केली जाते.

7.शिक्षक हे आपल्या विषयानुरुप साधनतंत्राची निर्मिती करतात. तसेच आवडीनुरुप साधनतंत्राची निर्मिती केली जातात. विद्यार्थ्यांशी साधनतंत्रे निर्मितीत सहभाग वाढविण्यासाठी चर्चा केली जाते. वेळोवेळी मार्गदर्शन व तज्ञांची सल्लामसलत सुचीवरुन दिसून येतो.

8.अध्ययन व मूल्यमापन या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. अध्ययनासोबतच मूल्यमापन हे केले जाते. म्हणून वार्षिक नियोजन करित असतांनाच त्यात मूल्यमापनाविषयी तरतूद केली जाते त्यात थोडीफार लवचिकता दिसून येते. 9.शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला व पालकांना आकारिक व संकलित मूल्यमापनाविषयी माहिती देण्यात येते यासाठी पालक सभा घेतली जाते. विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी स्पर्धा, खेळ, प्रश्नमंजुषा इ. घेण्यात येतात.

10.अध्यापन व मूल्यमापन सोबतच होत असते. म्हणून शिक्षकच ते उत्तम रितीने पार पाडू शकतात. त्यात शिक्षकच हा तज्ञ असतो. म्हणून अन्य तज्ञ व्यक्तिची नेमणूक करणे गरजेचे नसते.

**शिफारशी**

1.आकारिक व संकलित मुल्यमापनाविषयी शिक्षकांना येणा-या अडचणी दूर होण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

2.विद्यार्थ्यांचा सातत्याने विकास होईल यासाठी शिक्षकांनी ही पध्दती योग्य रितीने अंमलबजावणी करावी.

3.शिक्षक व विद्यार्थी यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित व्हावे यासाठी शिक्षकासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे.

4.वेळेचे व अध्यापनाचे नियोजन शिक्षकांनी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच करावे.

5.मुख्याध्यापकांनी शिक्षकांना पूर्णपणे आकारिक व संकलित मूल्यमापन पध्दतीविषयी समजून सांागवे.मुख्याध्यापकांनी विद्यार्थी व पालक यांना सुध्दा या पध्दतीचे महत्व समजून सांगावे.मुख्याध्यापकांनी आकारिक व संकलित मूल्यमापनात येणा-या अडचणी दूर करण्यास सहकार्य करावे.मुख्याध्यापकांनी वेळोवेळी आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण वर्गांना शिक्षकांना नियमित पाठवावे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1.अहेर हिरा, (1995), “उद्योन्मुख भारतातील शिक्षक व शिक्षण” नागपुर, विद्या प्रकाशन

2.आगलावे प्रदिप, (2000), “संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे”, नागपूर विद्या प्रकाशन

3.आलोनी अर्चना, (2009), “शैक्षणिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापन” नागपूर, पिंपळापूरे अँड कंपनी पब्लिशर्स.

4.क-हाडे ब. म.,(2007), “शास्त्रीय संशोधन पध्दती”, नागपुर, पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लिशर्स.

5.कदम चा. प., (2007), “शैक्षणिक संख्याशास्त्र”, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.

6.कुलकर्णी विश्वंभर, (2006), “आधुनिक शिक्षण समस्या व उपाय”, पुणे,नित्यनुतन प्रकाशन.

7.गाजरे चिटणीस, (2006), “शिक्षणाचे अधिष्ठान”, पुणे, नित्यनुतन प्रकाशन.

8.घोरमोडे कृष्णा, (2006), “शैक्षणिक कृति संशोधन”, नागपूर विद्या प्रकाशन.

9.घोरमोडे कृष्णा कला (2006), “शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे”, नागपूर, विद्याप्रकाशन.